नियमित फौ. ख. क्र. ३१/२०२५
सरकार -वि.- दर्शन
नि.क्र. १८.

**सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी**

**मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,**

माझे नाव - रमेश पांडुरंग येडे,
वय ५० वर्षे, व्यवसाय – ए.एस.आय.
राहणार – पोलीस स्टेशन भिवापुर, ता. भिवापुर, जि. नागपूर.

**सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत**

१. मी आरोपींना ओळखतो. ते आज न्यायालयात हजर नाही. दिनांक १९.०१.२०२५ रोजी मी पोलीस स्टेशन भिवापूर येथे ए.एस.आय म्हणून कार्यरत होतो. मी त्यादिवशीपोलिस स्टेशन टि पांईट येथे वरिष्ठांच्या आदेशान्वये नाकाबंदी लावली होती. त्यावेळी मुखबीरव्दारे खबर मिळाली की, एक पांढऱ्या हिरव्या रंगाचा टिप्पर विना परवाना रेती घेऊन जाणार आहे. मी दोन पंचांना समन्स दिला. आता मला दाखविलेला समन्स तोच आहे. त्यावर माझी व दोन पंचांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **निशाणी १९** देण्यात येते. त्यानंतर दुपारी १ वाजेच्या दरम्यान एक टिप्पर येतांना दिसला. त्यानंतर आम्ही पंचांसह तहसिल कार्यालय भिवापुर येथे एक टिप्पर अडवला. त्याचे चालकाकडे विचारपूस केली व टिप्परची पाहणी केली. त्या टिप्परचा क्र. एम.एच.४०-वाय .८४३३ असा होता. त्या टिप्परच्या पाहणीच्या दरम्यान त्यामध्ये ६ ब्रास रेती आढळून आली. त्या चालकाचे नाव दर्शन देशमुख होते. चालकाला परवान्याबाबत विचारता त्याने नकार दिला. त्यानंतर मी घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार केला. आता मला दाखविलेला वरील घटनास्थळा वजा जप्ती पंचनामा तोच आहे. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२०** देण्यात येते. मी घटना स्थ्ळाचे फोटो काढले होते. आता मला दाखविलेला फोटो तेच आहे त्यास **आर्टिकल अ व ब** देण्यात येत आहे. त्यानंतर टिप्पर घेऊन मी पोलीस स्टेशनला

आलो व फिर्याद दिली. आता मला दाखविलेली फिर्याद तिच आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **नि.क्र २१** देण्यात येते. आता मला छापील प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. त्यास **नि.क्र.२२** देण्यात येते.

**सरतपास संपला.**

**<u>उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्री. फलके यांचे मार्फत</u>**

२. हे म्हणणे खरे नाही की मी नाकाबंदी केल्या संदर्भात स्टेशन डायरीवरील नोंद दाखल केलेली नाही. मी टिप्पर येण्याबाबतची माहिती तहसिलदारांना दिली नव्हती. साक्षीदार सांगतो की मी ते माहिती वरिष्ठांना दिली होती. हे म्हणणे खरे नाही की मी तहसिलदारांना माहिती दिली नाही कारण मला आरोपीवर खोटा गुन्हा दाखल करायचा होता. मी घटनास्थळावर हजर असलेल्या लोकांना पंच म्हणुन बोलविले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचांना नोटीस दिला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी केसेसचा टार्गेट पुर्ण करण्यासाठी खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचासमक्ष घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा तयार केला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की मी ट्रक मध्ये असलेली रेती मोजण्याकरीता कुठेही मोजणी केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास संपला.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक ०५.०३.२०२६

स्वा/-
(एस.जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
**भिवापूर.**